**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५७/२०१६ मधील निशाणी क्र. ४४ वरिल आदेश</u>**
(हाफिजअली सैय्यद व इतर वि. कमरअली सैय्यद व इतर)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ सिराज हुसेन मुस्ताफाअली सैय्यद यांच्याविरूध्द झालेला अबेटमेंट आदेश रदद करून मिळणेकरीता केलेला आहे. वादी कथन करतात की, दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १६.०२.२०२२ रोजी मयत झाले. प्रस्तुत वादी यांना वारस रेकॉर्डवर घेणेबाबत कायदेशीर माहिती नव्हती. प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. सबब वादींचा अर्ज मंजुर करण्यात येवुन वारस रेकॉर्डवर घेणेकामी अबेटमेंट सेट असाईड करून मिळण्याची विनंती केली.

**०२.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करून कथन केले की, वादीने दाखल केलेला अर्ज खरा, प्रामाणिकपणाचा व कायदेशीर नाही. दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीने दावा सहा वर्षापुर्वी दाखल केला असुन सदर दाव्यातील प्रतिवादी १६.०२.२०२२ रोजी मयत झाले आहे. वादीने सुमारे ११ महिने उशीरा अर्ज देवुन दाव्याचे कामकाज लांबवले आहे. सबब वादीचा अर्ज नामंजुर करावा. यदाकदाचित वादीचा अर्ज मंजुर करण्याचे मे. न्यायालयाचे मत झाल्यास रक्कम रूपये ५०००/— इतकी कॉस्ट करावी.

**०३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. दावा हा ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अर्जासोबत निशाणी ४५ कडे प्रतिज्ञापत्र दाखल आहे. प्रतिवादी क्र. ४ सिराज हुसेन मुस्ताफाअली सैय्यद हे दिनांक १६.०२.२०२२ रोजी मयत झाल्याचे वादीने कथन केलेले आहे. मुदतीच्या कायदान्वये ९० दिवसांच्या आत मयताचे वारस अभिलेखावर घेणे क्रमप्राप्त आहे. वादीचा अर्ज दिनांक १९.०१.२०२३ रोजीचा आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेस निश्चितच विलंब झालेला आहे.

**०४.** प्रस्तुत दाव्यामध्ये गावमौजे मंचर येथील सिटी सर्वे क्रमांक ४०१ पैकी ३६—१४ चौ. मी या क्षेत्राचे वादी हे मालक असल्याचा जाहीर ठराव वादीने मागितला आहे. दाव्यामध्ये मिळकतीचे व कायदेशीर हक्काचे प्रश्न असल्याने, न्यायाच्या दृष्टीने दाव्यामधील आवश्यक पक्षकार त्यांचे वारस आणि त्यांचे म्हणणे

पुरावे दाव्याकामी समाविष्ट करून घेणे हे दाव्याचा गुणदोषावर अंतीम निकाल होण्याकामी आवश्यक आहे. दाव्यामध्ये मिळकतीबाबत असलेला कायदेशीर हक्क अधिकार याबाबतचे प्रश्न महत्वपुर्ण आहेत. सबब न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ४ यांच्याविरूध्द अबेट झालेला दावा रदद करून त्यांच्या वारसांना दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. निशाणी ४४ खर्च रक्कम रूपये ३००/— भरण्याच्या अटीवर मंजुर करून प्रतिवादी क्र.४ यांच्या विरूध्दचा दावा अबेटचा आदेश रदद करण्यात येतो.

२. खर्च रक्कम रूपये ३००/— प्रतिवादी यांना देण्यात यावी.

दिनांक: ०९.१०.२०२३

**(एम. ए. के. शेख)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगाव